क्र.महानिर्मिती/मासं(सेप्र)/ No - 2816 दि.०८.०३.२०२१

8 MAR 2021

महानिर्मिती

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

**सूचना**

**विषय:-** जाहिरात क्र. ०४/२०१९अन्वये कागदपत्रे पडताळणीअंती तंत्रज्ञ-३ पदी निवड करण्यात आलेल्या परंतु स्थानिक स्तरावर पात्रतेबाबत निर्णय न घेण्यात आलेल्या उमेदवारांबाबत.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०१९.
२) महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(मासं-सेप्र)/२०८६ दि. २९.०२.२०२०.
३) महानिर्मती अधिसूचना क्र.महानिर्मिती/मासं-१/तंत्रज्ञ-३/CVD-१९/LDN/ऑगस्ट २०/३९४ दि.२५.०८.२०२०
४) महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(मासं-सेप्र)/५९८३ दि.१८.१२.२०२०.
५) महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(मासं-सेप्र)/२६२१ दि.०१.०३.२०२१

---

महानिर्मिती कंपनीतर्फे ०४/२०१९ अन्वये तंत्रज्ञ-३ यांची रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदांची ऑनलाईन परिक्षा दि.१६,१७ आणि दि.१८.१२.२०१९ रोजी महाराष्ट्रातील विविध केंद्रावर पार पाडण्यात आली होती. ऑनलाईन परिक्षेतील प्राप्त गुणांनुसार रिक्त पदांच्या अनुषंगाने तसेच सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून महानिर्मिती सूचना क्र.महानर्मिती/स.म.व्य.(मासं-सेप्र)/२०८६ दि.२९.०२.२०२० अन्वये तंत्रज्ञ-३ पदाची अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच संदर्भिय क्र ०३ वरील सूचनेनुसार उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करिता बोलविण्यात आले होते. सदरील कागदपत्र पडताळणी प्रक्रिये अंती उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्र/दस्तऐवजांच्या अनुषंगाने महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(मासं-सेप्र)/५९८३ दि.१८.१२.२०२०. नुसार विद्युत केंद्र स्थरावर "पात्र", "अपात्र" तसेच "निर्णय न घेण्यात आलेल्या" उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती.

आता, मा.सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरी अन्वये विद्युत केंद्र स्तरावर निर्णय न घेण्यात आलेल्या उमेदवारांची "पात्र", "अपात्र" आणि "प्रलंबित" उमेदवारांची यादी खालील प्रमाणे आहे. तसेच सदरील उमेदवारांना लागू असलेले अटी व नियम खालील प्रमाणे:-

१) "पात्र" म्हणून घोषित उमेदवारांना त्यांची शैक्षणिक, समांतर आरक्षणातंर्गतची आणि जात वैधता प्रमाणपत्राबाबतची कागदपत्रे संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्या पडताळणी अहवालाच्या अधिन राहून नियुक्ती पत्रे निर्गमित करण्यात येत आहेत. तथापि, खेळाडू आरक्षणातंर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांनी सदरील खेळाडू प्रमाणपत्राचा वैधता अहवाल सादर केल्यानंतरच नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येतील.

२) म.रा.वि.मं. कर्मचारी सेवा जेष्ठता विनियम,१९६१ नियम क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जेष्ठता निश्चित करण्याच्या प्रयोजनास्तव सेवाकालाची गणना नियुक्तीच्या तारखेपासून करण्याची तरतूद असली तरीही उपरोक्त प्रकरणी उमेदवारांची सेवाजेष्ठता ही ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणानुक्रमे ठेवण्यात येईल.

३) तंत्रज्ञ-३ पदाची नियुक्तीपत्रे कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत असल्याने पडताळणी अंती कोणतीही कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळल्यास सदरील नियुक्तीपत्र रद्द करण्यात आले आहे असे समजण्यात यावे.

४) खालील यादीत प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत संबंधित कार्यालय/विभाग/संस्थेमार्फत खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

५) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल सिविल अपील क्र.३१२३/२०२० (विषेश अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९) अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गासाठीच्या आरक्षणाला सद्यास्थितीत पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. करिता, "पात्र" म्हणून घोषित उमेदवार यांची निवड सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातून झाली असल्यास, सदरील उमेदवारांना सध्या नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येणार नाही. सदरील प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून वेळोवळी प्रसारित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयानूसार भविष्यात कार्यवाही करण्यात येईल. तथापि, सदरील उमेदवारांना महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(मासं-सेप्र)/२६२१ दि.०१.०३.२०२१ अन्वये दि.३१.०३.२०२१ पर्यंत ते उमेदवार इच्छुक असल्यास "आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे" (ई.डब्लु.एस) अथवा "खुला" प्रवर्गातून निवडीसाठी विकल्पाचा अर्ज सादर करु शकतील.(अधिक माहितीसाठी कृपया महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/स.म.व्य.(मासं-सेप्र)/२६२१ दि.०१.०३.२०२१ पहावी.)

६) तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यु.एस.) प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे निर्गमित करण्यात येणार नाहीत त्यांच्या बाबतीत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल याचिका क्र.(स्टॅम्प) ९८३००/२०२०, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.९०८२/२०२०, क्र.३३१/२०२१, व क्र.३९६/२०२१ आणि विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या संलग्न/ईतर याचिकांच्या अंतरिम / अंतिम निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

७) "अपात्र" ठरलेल्या उमेदवारांनी कोणताही पत्रव्यवहार करु नये, सदरील पंत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

८) "प्रलंबित" उमेदवारांप्रकरणी त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही सुरु असल्याने, कार्यवाहीअंती त्यांच्या पात्र/अपात्रतेबाबत निर्णय महानिर्मिती कंपनीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९) सदरील पात्रता यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही.

**पात्र उमेदवार यादी**

**अपात्र उमेदवार यादी**

**निर्णय प्रलंबित उमेदवार यादी**

(भि.य.मंता)
कार्यकारी संचालक (मासं)